**MHKO100003302019**

## <u>आदेश निशाणी क्र. २७</u>

१.	प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२.	प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज व वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३.	प्रतिवादी क्र. १ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ बाजूने चालून निर्णित होईल या आशेपोटी प्रतिवादी यांनी वादीचे दावेस कैफीयत व मनाई अर्जास म्हणणे वेळेत सादर करणेस वेळ झालेला आहे. प्रतिवादी यांनी कैफीयत देणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी यांना कैफीयत व म्हणणे दाखल करुन घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४.	वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक १६/०४/२०१९ रोजी नोटीस लागू झाली आहे. सदर कामी प्रतिवादी यांनी आपली कैफीयत व म्हणणे देणेस जवळजवळ ४ वर्षे ३ महिन्याचा विलंब झाला आहे. वादी यांना त्रास देण्याकरीता प्रतिवादी यांनी आपली कैफीयत उशीरा दाखल केली आहे. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे व न्यायाचे दृष्टीने मंजूर करावयाचा झाल्यास रक्कम रुपये ५०००/- खर्च बसविणेत यावा अशी विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द दिनांक ०४/०५/२०१० रोजी खरेदीपत्र बेकायदेशिर असून ते रद्दबातल आहे असा जाहीर ठराव होवून मिळणेकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी आपल्या अर्जामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ बाजूने चालून निर्णित होईल या आशेपोटी प्रतिवादी यांनी वादीचे दावेस कैफीयत व मनाई अर्जास म्हणणे वेळेत सादर करणेस वेळ झालेला आहे असा बचाव घेतलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ यांनी दाखल केलेला निशाणी क्र. २२ वरील अर्ज दिनांक २४/०३/२०२२ रोजी निर्णित झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुतचा अर्ज १२/०४/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रतिवादी क्र. १ यांनी जवळजवळ १० ते ११ महिन्यानंतर प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ यांनी आपल्या अर्जामध्ये कैफीयत व म्हणणे दाखल करणेस घेतलेल्या बचावमध्ये तथ्य असल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक १६/०४/२०१९ रोजी निशाणी क्र. ६ प्रमाणे दाव्याचे समन्स लागू झाले आहे. म्हणजेच प्रतिवादी क्र. १ यांनी मुदत संपल्यानंतर जवळजवळ ३ वर्षे ३ महिन्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रकरणात परिणामकारक चौकशी सुरु झालेली नाही. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१)** प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ७००/- (अक्षरी रुपये सातशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेच्या आत अथवा पुढील तारखेदिवशी अदा करावी. प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम वर मुदतीत अदा न केलेस सदरचा आदेश आपोआप रद्द समजणेत यावा.

**३)** प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

DHANASHRI MAHADEV PAWAR

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.08.09 16:12:44 +0530

**ठिकाण – गडहिंग्लज**
**दिनांक ०९/०८/२०२३**

**डी. एम. पवार**
**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.**
**गडहिंग्लज**